Impact Factor – 7.367

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.121

## Women Empowerment in India : Journey of 75 Years

**Chief Editor**

Dr.Pramod P. Tandale

**Editor**

Prof. Rajani Shikhare

IMPACT FACTOR

SJIF 7.367

For details Visit our website

www.aiirjournal.com

Impact Factor – 7.367 ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.121

## Women Empowerment in India : Journey of 75 Years

**Chief Editor**

Dr.Pramod P. Tandale

**Editor**

Prof. Rajani Shikhare

IMPACT FACTOR

SJIF 7.367

For details Visit our website

www.aiirjournal.com

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 16. | संतोष नागरे<br>प्रो. रजनी शिखरे | स्वातंत्र्योत्तर हिंदी कविता और स्त्री सशक्तिकरण | 57 |
| 17. | प्रा.सौ. रोहिणी गुरूलिंग खंदारे | 'आवाँ' उपन्यास में चित्रित नारी विमर्श | 61 |
| 18. | नितीन नामदेव माळी | आजादी के 75 वर्ष बाद शिक्षा | 65 |
| 19. | डॉ. संतोष भिवसन काकडे | एकविसाव्या शतकातील महिला सक्षमीकरण: दशा आणि दिशा | 67 |
| 20. | डॉ. एस. आर. मगर | राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण | 73 |
| 21. | डॉ. संजय कांबळे | महिला स्वयं साहाय्यता बचतगटाचा उदय, विकास आणि वाटचाल | 76 |
| 22. | प्रा. डॉ. उर्मिला रेड्डी | डिजिटल इंडिया व महिला सक्षमिकरण | 79 |
| 23. | डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे | महिला सबलीकरण आणि महिलांचा शाश्वत विकासातील महाराष्ट्र प्रशासनाची भूमिका | 84 |
| 24. | प्रा.दिगंबर गंगावणे | महिला सबलीकरणात स्वयंसहाय्य समूहाची भूमिका | 87 |
| 25. | डॉ.मदन राजाराम काळे | भारतातील महिला सक्षमीकरणाच्या योजना | 89 |
| 26. | प्रा. डी. के. कटके<br>हनमंत बा. हेळंबे | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षणाचा मूलभूत अधिकार | 94 |
| 27. | डॉ. जाधवर बी.डी. | भारतीय चळवळीतील आर्य समाजाची भूमिका | 98 |
| 28. | पटाईत रेश्मा गांधी | बचत गट आणि महिला आर्थिक सक्षमीकरण, बीड जिल्ह्यातील बचत गटाच्या संदर्भात विशेष अध्ययन | 100 |
| 29. | चित्रा भीमराव जोंधळे | महिला सक्षमीकरण व सामाजिक स्थिती | 104 |
| 30. | प्रा. अहिरे विलास सांडूजी | महिला सबलीकरणाची स्थिती व वास्तविकता | 107 |
| 31. | डॉ.सिध्देश्वर सटाले | महिलांचे राजकीय सक्षमीकरण | 111 |

Special Issue Theme :- Women Empowerment in India : Journey of 75 Years
(Special Issue No.121) ISSN 2349-638x Impact Factor 7.367
March 2023

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षणाचा मूलभूत अधिकार

**प्रा. डी. के. कटके**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गडी.
ता. गेवराई, जि. बीड.

**हनमंत बा. हेळंबे**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई
ता. गेवराई, जि. बीड.

**प्रस्तावना**

अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन गरजांबरोबर शिक्षण हेसुद्धा आधुनिक काळातील एक मूलभूत गरज आहे. केवळ कर्तव्य म्हणून मुलांना शिक्षण देण्यापेक्षा त्याचा मूळ उद्देश लक्षात घेऊन ते दिले गेले तर क्रांती होऊन आदर्श समाजाची उभारणी होऊ शकते. शिक्षणामुळे मानवाला भविष्य उज्ज्वल करण्याचे सामर्थ प्राप्त होते. या सामर्थ्याच्या जोरावरच तो आयुष्यातील सर्व समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जातो. शिक्षणाद्वारे मानवाच्या विविध क्षमतांचा विकास साधला जाऊन मानवी जीवन गतिमान होते. शिक्षणाद्वारे मानवांमध्ये ज्ञानसंपादन क्षमता, तर्क व विचार करण्याची क्षमता, व्यावहारिक कार्यक्षमता, सामाजिक गुणांचा विकास, नागरिकत्व, राष्ट्रीयत्व आणि चारित्र्यसंवर्धन या सर्व बाबींचा विकास होत असतो. त्यामुळे कोणतेही राष्ट्र जनतेच्या शिक्षणाची काळजी सातत्याने घेत असते.

जगातील १३५ पेक्षा अधिक राष्ट्रांनी आपल्या राज्यघटनेत शिक्षणविषयक मूलभूत अधिकार समाविष्ट केलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध अधिवेशने, करार, संमेलने यांच्या माध्यमातून बालकांच्या शिक्षणाच्या अधिकाराबाबत वेळोवेळी प्रोत्साहन दिले जाते व शासनाला कर्तव्याची जाणीवदेखील करून दिली जाते. भारतात ८६व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे. भारतीय राज्यघटनेत भारतातील नागरिकांना कलम २१ अंतर्गत चांगले व गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याचा अधिकार दिला आहे आणि २१ 'A' या कलमांतर्गत शिक्षणविषयक अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट केला आहे. शिक्षणविषयक अधिकार हा व्यापक दृष्टीने समानता, उपलब्धता आणि गुणवत्ता असे सांगतो.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने देशाच्या शिक्षणव्यवस्थेत अनेक धोरणात्मक मूलभूत स्वरूपाचे बदल झाले. त्यानंतर ३४ वर्षांनी प्रवेश समानता, गुणवत्ता, परवडणारी क्षमता आणि उत्तरदायित्व या मूलभूत स्तंभावर आधारित २१व्या शतकातील पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले. या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे हे आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे इस्रोचे माजी संचालक व विख्यात अंतराळशास्त्रज्ञ के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तीन वर्षे परिश्रम करून तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सर्वसंबंधितांशी व्यापक विचारविनिमय आणि सल्लामसलत करून तयार केले आहे. या धोरणाची २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी सांगड घालण्यात आली आहे. या धोरणाचे ध्येय भारताला एक जागतिक महासत्ता बनवून भारताचे एका न्याय आणि चैतन्यमय ज्ञान-समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात प्रत्यक्षपणे योगदान देणारी अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे हे आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात भाग-१ शालेय शिक्षण, भाग-२ उच्च शिक्षण, भाग-३ विचार करण्याचे इतर महत्त्वाचे केंद्रीय मुद्दे, भाग-४ अंमलबजावणी यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये सर्वसाधारणपणे शिक्षणव्यवस्था आणि त्याबरोबरच स्वतंत्र संस्था या दोन्हींना मार्गदर्शन करणारे मूलभूत सिद्धान्त आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर सार्वजनिक प्रवेशाच्या संधीची सुनिश्चिती केली आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्रारंभिक बालअवस्थेतील संगोपन आणि शिक्षणापासून माध्यमिक अशा स्तरावर शालेय शिक्षणाला सार्वत्रिक संधी सुनिश्चित करण्यावर भर दिलेला आहे. पायाभूत सुविधा साहाय्य, शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कित्येक शिक्षण केंद्रे, विद्यार्थी आणि त्यांच्या अध्ययन स्तराचा मागोवा, औपचारिक आणि

अनौपचारिक शिक्षणपद्धतीसह शिक्षणाचे अनेक मार्ग सुलभ करणे, शाळांमध्ये समुपदेशक किंवा उत्तम प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांची सांगड, एनआयओएस व राज्यातल्या मुक्त शाळा याद्वारे ३, ५ आणि ८व्या इयत्तेसाठी खुली शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रौढ साक्षरता आणि जीवन समृद्ध करणारे कार्यक्रम या मार्गाने हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे.

शालेय अभ्यासक्रमातील १०+२ च्या शैक्षणिक आकृतिबंधाची जागा आणि ५+३+३+४ ने घेतली आहे. सध्याच्या १०+२ या शैक्षणिक आकृतिबंधात ३ ते ६ वयोगटातील बालकांचा समावेश होत नाही. नवीन संरचित ५+३+३+४ शैक्षणिक आकृतिबंधात प्रारंभिक संगोपन यावर भर देण्यात आला आहे. त्याबरोबरच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पुढील बाबींवर भर देण्यात आला.

- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करणे.
- प्रत्येक बालकासाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना इयत्ता तिसरीपर्यंत सर्वोच्च प्राधान्य देणे.
- ज्ञानाच्या क्षेत्रातील हानिकारक उच्च-नीचता आणि त्यांच्यात पडलेले अंतर दूर करण्यासाठी कला आणि विज्ञान अभ्यास आणि अभ्यासेतर उपक्रम, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह यांच्यात कोणतेही स्पष्ट विभाजन असू नये.
- एका बहुआयामी जगासाठी विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानव्यशास्त्रे आणि खेळ यांच्यामध्ये बहुशाखीय (Multi-disciplinary) आणि समग्र शिक्षणाचा विकास यावर भर देण्यात यावा.
- अध्यापनात आणि अध्ययनात बहुभाषिकाचा आणि भाषा शक्ती यांना प्रोत्साहन देणे.
- घोकंपट्टीऐवजी किंवा परीक्षेसाठी शिकण्याऐवजी संकल्पना समजून घेण्यावर भर.
- एनईपी २०२० मध्ये सारांशात्मक मूल्यांकनाकडून नियमित आणि रचनात्मक मूल्यांकनाकडे वळण्याची कल्पना मांडली आहे. जी अधिक योग्यता आधारित आहे. बालकांच्या शिकण्यासाठी सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर देण्यात आला पाहिजे.
- अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे धोरण.
- शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय आहे, हे लक्षात घेऊन सर्व अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि धोरण यात विविधतेबद्दल आणि स्थानिक संदर्भांबाबत आदर व्यक्त करण्यात आला आहे.
- शिक्षणव्यवस्थेत सर्व विद्यार्थ्यांना प्रगती साधता यावी, यासाठी सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशकता ही पायाभूत गोष्ट मानली आहे.
- प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षणापासून ते शालेय शिक्षण व उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळ्यांवरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात समानता.
- शिक्षक व प्राध्यापक हे शिक्षण प्रक्रियेचे केंद्र मानणे आणि भरतीपासून व्यावसायिक विकास आणि कामकाजाचे वातावरण व सेवेची स्थिती सकारात्मक असणे.
- शिक्षणप्रणालीची अखंडता, पारदर्शकता आणि संसाधनांची कार्यक्षमता ऑडिट आणि सार्वजनिक प्रकटीकरणाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यासाठी एक 'सुलभ पण परिणामकारक' नियमांची चौकट देणे.
- शाळा संकुले किंवा समूहामध्ये आयोजित केले जाऊ शकतात, ते प्रशासनाचे मूलभूत घटक असतील आणि पायाभूत सुविधा, शैक्षणिक ग्रंथालये आणि बळकट व्यावसायिक शिक्षक समुदायासह सर्व संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करेल.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये शिक्षण ही सार्वजनिक सेवा आहे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असणे, हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क समजला पाहिजे, असे सांगितले आहे. नवीन शैक्षणिक धोरणात १०+२ या शैक्षणिक आकृतिबंधाऐवजी ५+३+३+४ अशी नवीन अध्यापनशास्त्राची व अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाने ५+३+३+४ या शैक्षणिक संरचनेत वय वर्षे ३ पासून प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचा पायादेखील मजबूत केला आहे. लहान मुलांच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी ८५ टक्क्यांहून अधिक विकास वयाच्या ६ वर्षांपर्यंत होतो. म्हणून गुणवत्तापूर्ण बाल्यावस्था पूर्वविकास संगोपन आणि शिक्षणाची सार्वत्रिक तरतूद शक्य

तितक्या लवकर आणि २०३० च्या आत होणे आवश्यक आहे. म्हणजे इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश करणारे सर्व विद्यार्थी शालेय शिक्षणासाठी सज्ज असतील.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे देशभरात उच्च गुणवत्तापूर्ण ECCE ची (अर्ली चाइल्ड केअर ॲण्ड एज्युकेशन) प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सार्वजनिक उपलब्धता सुनिश्चित करणे, हे उद्दिष्ट असेल. प्रारंभिक बाल्यावस्था शैक्षणिक संस्थांचा लक्षणीयरीत्या विस्तार आणि त्याचे बळकटीकरण केलेल्या यंत्रणेद्वारे ECCE प्रदान केले जाईल. यामध्ये (अ) स्वतंत्र अंगणवाड्या, (ब) प्राथमिक शाळांसोबत असलेल्या अंगणवाड्या, (क) विद्यमान प्राथमिक शाळांसोबत असलेल्या पूर्वप्राथमिक शाळा/विभाग ज्यामध्ये ५-६ वर्षे हा वयोगट समाविष्ट असेल.

विविध शासकीय आणि बिगरशासकीय सर्वेक्षणांवरून शासनाच्या असे लक्षात आले आहे की, सध्याच्या प्राथमिक शाळेतील अंदाजे ५ कोटींपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान प्राप्त केले नाही. अशा सर्व मुलांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी तातडीने राष्ट्रीय अभियान बनविण्याचे विहित आहे. २०२५ पर्यंत सर्व प्राथमिक शाळांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान साध्य करणे, ही शिक्षणव्यवस्थेची सर्वोच्च प्राथमिकता असेल, असे म्हटले आहे. बालकांच्या १०० टक्के लसीकरणासाठी आरोग्य कार्ड देण्याचे निहित आहे. मुलांनी शाळेत प्रवेश घेतलेला आहे आणि ते शाळेत उपस्थित राहत आहेत, हे सुनिश्चित करणे शालेय व्यवस्थेचे एक उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. स्थगन व गळतीची समस्या थांबवून देशातील सर्व मुलांना शाळापूर्व ते इयत्ता १२वीपर्यंतच्या व्यावसायिक शिक्षणासह गुणवत्तापूर्ण सर्वांगीण शिक्षणाची सार्वत्रिक उपलब्धता सुनिश्चित केली जाईल. तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटावर विशेष भर देऊन शालेय शिक्षणाची व्याप्ती वाढविण्याचे निश्चित केले आहे. देशात शाळाबाह्य असलेल्या २ कोटींहून अधिक बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. यासाठी शाळांच्या भौतिक आणि मानवी संसाधनांच्या पुरेपूर उपलब्धतेची खात्री दिलेली आहे. अशारीतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने सर्वांत चांगल्या आणि उद्याचा समर्थ भारत घडविण्याची क्षमता असणारा बदल म्हणजे प्रथम शिक्षणात तीन ते सहा वयोगटाचा म्हणजे अंगणवाडी/नर्सरी-के.जी. या वर्गाचा समावेश केलेला असेल. त्याला जोडून पहिली व दुसरीचे दोन वर्षे जोडून त्याचा निर्माण केलेला पाच वर्षांचा पायाभूत शिक्षणाचा भाग राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये ६ वर्षे वयापर्यंत बालकाच्या मेंदूचा विकास होतो. त्या काळात त्यांना त्यांच्या वाढीचा व बौद्धिक क्षमतेचा विचार करून शास्त्रशुद्धरीतीने खेळ व क्रिया निगडित बाबींनी त्यांना पुढील शिक्षणासाठी तयार करा व आधी क्रांतिकारी शिफारस केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने सध्याची देशातील १०+२ ह्या शैक्षणिक आकृतिबंधाऐवजी ५+३+३+४ हा नवीन शैक्षणिक आकृतिबंध आणला आहे की, जो जगामध्ये प्रचलित आहे. सध्याच्या शिक्षणविषयक हक्कानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद आहे, ते वय ३ ते १८ वर्षे अशी १५ वर्षांची करावी, अशी क्रांतिकारी शिफारस केली आहे. यानुसार असे लक्षात येते की, शासनाने बारावीपर्यंत शिक्षणाची हमी घ्यावी व २०३० पर्यंत १०० टक्के पटनोंदणी साध्य करून शिक्षणविषयक अधिकारांपासून कोणीही वंचित राहणार नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर आणि ८६वी घटनादुरुस्तीच्या आधारावर बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणविषयक हक्कांची व्याप्ती वाढविण्यासाठी शासनाने संसदेत नवीन घटनादुरुस्ती विधेयक आणावे. हे घटनादुरूस्ती विधेयक काळाप्रमाणे बालकांच्या शिक्षणविषयक गरजांची पूर्तता करणारे व्यवहार्य असावे.

थोडक्यात, बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी सर्वप्रथम 'बालकेंद्रित शिक्षण पद्धती' विकसित करण्यासाठी सर्व घटकांनी हातभार लावणे गरजेचे आहे. 'बालकेंद्रित शिक्षणपद्धती निर्माण करण्यासाठी' शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, व्यवस्थापन, मुख्याध्यापक आणि शिक्षक या सर्वांनी सकारात्मक दृष्टीने समन्वयात्मकरीत्या कार्य केले पाहिजे. शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सर्व शाळांना मानवी आणि भौतिक संसाधनांची पूर्तता होईल, या दृष्टीने निर्णय घेऊन ते अमलात आणले पाहिजेत. शासनाने मानवी आणि भौतिक संसाधनांच्या पूर्ततेसाठी अंदाजपत्रकीय तरतूद वाढवावी. प्रबळ राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर विविध शाळांच्या विविध समस्या सोडविणे गरजेचे आहे. शिक्षकाने पायलटप्रमाणे आणि मुख्याध्यापकांनी कप्तानच्या भूमिकेत राहून शाळेत गुणवत्तापूर्ण आणि अर्थपूर्ण अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही गतिमान केली पाहिजे. स्थगन आणि गळतीच्या समस्येच्या निर्मूलनासाठी शासनापासून पालकांपर्यंत

प्रत्येकाने आपापल्या स्तरावरील समस्या समन्वयाने सोडविल्या पाहिजेत. वंचित आणि दुर्बल घटकातील बालकांसाठीच्या राखीव जागांच्या धोरणांची अंमलबजावणी प्रत्यक्षरीत्या प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. आजच्या काळात केवळ पाठ्यपुस्तकांवरच अभ्यासक्रम पूर्ण होऊ शकत नाही, तर त्यासाठी सर्व शाळांचे वेगाने 'डिजिटलायझेशन' होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने योग्यवेळी निर्णय घेणे व शाळांच्या 'डिजिटलायझेशन'चे धोरण अमलात आणावे. देशातील शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी सार्वजनिक शिक्षणव्यवस्था सुदृढ करणे ही काळाची गरज आहे. सुदृढ सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेबरोबरच शैक्षणिक प्रशासनाची पुनर्रचना करून देशातील एकही मूल शिक्षणविषयक हक्कापासून वंचित राहणार नाही, यासाठी शासनापासून पालकांपर्यंत सर्वांनी आपल्या हक्क व कर्तव्याप्रति योग्य भूमिका निभावणे गरजेचे आहे. बालकांच्या शिक्षणविषयक अधिकाराची अंमलबजावणी जेवढ्या अधिक प्रमाणात प्रभावीरीत्या होईल, तेवढ्या प्रमाणात सर्वांना सन्मानपूर्वक व गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याचा हक्क प्राप्त होईल.

**संदर्भ सूची :**


1. National Education Policy-2020, Education Ministry, GOI, New Delhi
2. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम-२०११
3. The Gazette of India, Extraordinary, Part-II, Section I, New Delhi
4. Aggrawal J.C. (1994), Recent Development and trends in Education, Concept Publishing Company, New Delhi.


Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com